**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०३

**सभावृत्तांत**

**दिनांक – २८/१२/२०२०** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **सोमवार** दिनांक **२८/१२/२०२०** रोजी **दुपारी ३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
**२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे**
**३. मा.डब्बू आसवानी(हिरानंद)**
**४. मा.दर्शले रेखा राजेश**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१) बाल भवन महिला व्यायामशाळा खराळवाडी ही उद्यमनगर मित्रमंडळ यांना चालविणेस देणेबाबत.- मा.रेखा दर्शले , मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.**

**विषय क्र.२) प्रभाग क्र.३० मधील खेळाचे मैदान अभिनव गगन स्पोटर्स क्लब कासारवाडी यासंस्थेस कराराने देणेबाबत.- मा.रेखा दर्शले, मा. शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.**

**विषय क्र.३) मनपाच्या ५ जलतरण तलावांची खोली कमी करणेबाबत.- मा.रेखा दर्शले, मा. शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.**

**विषय क्र.४) मनपाच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत टेबल टेनिस सेंटर सुरु करणेबाबत.- मा.रेखा दर्शले, मा. शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.**

**विषय क्र.५) थेरगाव बोट क्लब व्यायामशाळा अखिल नाधुंन्ज परिषद संभाजीनगर यांना ११ महिने कराराने देणेबाबत.- मा. शैलेश मोरे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.**

**विषय क्र.६) मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभेबाबत.- मा. शैलेश मोरे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.**

-------------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा. शैलेश मोरे                    अनुमोदक – मा.रेखा दर्शले

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समितीची सोमवार दिनांक २८/१२/२०२० रोजी होणारी पाक्षिक सभा(कार्यपत्रीका क्र.०३) दिनांक ०८/०१/२०२१ रोजी दुपारी २.४५ वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** – शुक्रवार दि.०८/०१/२०२१ रोजी दुपारी २.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **उत्तम प्रकाश केंदळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०३

**सभावृत्तांत**

**( दिनांक २८/१२/२०२० ची तहकूब सभा )**

**दिनांक – ०८/०१/२०२१** **वेळ – दुपारी २.४५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २८/०१/२०२१ रोजीची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक **०८/०१/२०२१** रोजी **दुपारी २.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -** आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने **सोमवार** दिनांक **११/०१/२०२१** रोजी दुपरी **२.१५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **उत्तम प्रकाश केंदळे** )

**सभापती**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०३

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २८/१२/२०२० व ०८/०१/२०२१ ची तहकूब सभा **)**

दिनांक – **११/०१/२०२१** वेळ - दुपारी २.**१५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **०८/०१/२०२१** ची तहकूब सभा सोमवार दिनांक **११/०१/२०२१** रोजी दुपारी **२.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**

२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

या शिवाय मा.खोत – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -**आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने **शुक्रवार** दिनांक **२२/०१/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **उत्तम प्रकाश केंदळे** )

**सभापती**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ०३**
**सभावृत्तांत**
( दिनांक २८/१२/२०२०, ०८/०१/२०२१ व ११/०१/२०२१ ची तहकूब सभा )

दिनांक – २२/०१/२०२१ वेळ - दुपारी २.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक ११/०१/२०२१ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २२/०१/२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती
२. मा.तुषार रघुनाथ हिंगे
३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा.भालेकर प्रविण महादेव
५. मा. दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.खोत – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

अ) दिनांक ११/१२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक - ०१
दिनांक – २२/०१/२०२१
सुचक :- मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

बालभवन महिला व्यायाम शाळा,खराळवाडी ही व्यायाम शाळा उद्यमनगर मित्र मंडळ या संस्थेस द.म.र.रु.२०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) मनपाकडून सेवाशुल्क देऊन ११ महिने कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक - ०२
दिनांक – २२/०१/२०२१
सुचक :- मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

मनपाच्या वतीने प्रभाग क्र.३० मधील आरक्षण क्र.२२ खेळाचे मैदान चालविले जाते. सदर मैदान सध्या वापरात नाही. कासारवाडी परिसर हा चाळ वजा घरांचा आहे. सदर परिसरातील मुलांना खेळण्यासाठी कोणतेही मैदान उपलब्ध नाही. अभिनव गगन स्पोटर्स क्लब कासारवाडी यांनी शहरातील मुलांना खेळात प्राविण्य मिळविण्यासाठी सदर मैदानाची मा.सौ.आशा तानाजी धायगुडे-शेंडगे यांचेकडे मागणी केलेली आहे. तरी मुलांच्या सर्वांगीण विकासाकरता, प्रभाग क्र.३० मधील आरक्षण क्र.२२ खेळाचे मैदान अभिनव गगन स्पोटर्स क्लब कासारवाडी या संस्थेस मनपाच्या दरानुसार सकाळी ६.०० ते ८.०० वा. व सायंकाळी ५.०० ते ७.००वा. या वेळेकरिता ५ वर्षाकरिता कराराने देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफार करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक - ०३
दिनांक – २२/०१/२०२१
सुचक :- मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

मनपाच्या वतीने एकूण १२ जलतरण तलाव चालविले जातात, १२ जलतरण तलावापैकी ७ जलतरण तलावांच्या खोली(Deepth) कमी असून ५ जलतरण तालावांच्या खोली खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालयाचे नांव | जलतरण तलावाचे नांव | सध्याच्या खोलींचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | अ | श्री.छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव, आकुर्डी | ३.५० फुट x १६ फुट |
| २ | अ | राजर्षी शाहु महाराज जलतरण तलाव, मोहननगर चिंचवड | ३.५० फुट x १४ फुट |
| ३ | ब | कै.वस्ताद बाळासाहेब गावडे जलतरण तलाव, केशवनगर,चिंचवड | ३.५० फुट x १४ फुट |
| ४ | इ | भोसरी जलतरण तलाव,भोसरी | ३.५० फुट x १४ फुट |
| ५ | ग | खिंवसरा पाटील जलतरण तलाव,थेरगाव | ३.५० फुट x १४ फुट |

वरील ५ जलतरण तलावांची खोली जास्त असल्योन, उन्हाळी सिझनमध्ये सर्वच जलतरण तलावांवर पोहणारे क्रीडा प्रेमी,नगारिक, जलतरण खेळाडू यांची मोठया प्रमाणात गर्दी होत असलते. या गर्दीमध्ये नवखे पोहणारे नागरिकांची जास्त संख्या असते. वरील जास्त जलतरण तलावांची खोली जास्त असल्याने सदर ठिकाणी गर्दीमुळे अपघात/जिवित हानी होऊ नये या दृष्टीने वरील ५ जलतरण तलावांची खोली कमी करणे आवश्यक आहे. तरी मनपाच्या आकुर्डी, मोहननगर, चिंचवड ,भोसरी, थेरगाव या ५ जलतरण तलावांची खोली (Deepth) कमी करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कामय होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक - ०४
दिनांक – २२/०१/२०२१
सुचक :- मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.शैलेश मोरे
संदर्भ – मा.रेखा दर्शले, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

मनपाच्या वतीने सध्या चिंचवड येथे टेबल टेनिस सेंटर करण्यात आलेली आहे. मनपा परिसरात विविध ठिकाणी टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन यांनी मागणी केलेली आहे. मनपा ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत टेबल टेनिस सेंटर सुरु केल्यास शहरात टेबल टेनिस खेळाडू तयार होण्यास मदत होईल. तरी मनपाच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस, तसेच फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत यमुनानगर जलतरण परिसरात टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस व त्याकामी आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चा प्रशासकीय मान्यता देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक - ०५

दिनांक – २२/०१/२०२१

सुचक :- मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ – मा.शैलेश मोरे ,मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव बोट क्लब व्यायामशाळा आखिल नाधुंन्ज परिषद संभाजीनगर, आकुर्डी ३५ यांना ११ महिने सेवा शुल्क तत्वावर कराराने व्यायामशाळा रक्कम रुपये २०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) महापालिकेकडून घेवून चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ०६

दिनांक – २२/०१/२०२१

सुचक :- मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ – मा.शैलेश मोरे ,मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती सभा संभाव्य मनपा पोट निवडणूक आचारसंहितेमुळे दिनांक १२/०२/२०२१ रोजी होणारी पाक्षिक सभा ही दिनांक २८/०१/२०२१ रोजी सकाळी ११.००वा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी .

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **उत्तम प्रकाश केंदळे**)
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४०/२०२१
दिनांक : 01/02/2021

**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.तज